# झाडांचे उपयोग - लाकूड

झाडापासून लाकूड मिळते.
लाकडापासून अनेक वस्तू बनवता येतात.
लाकूड सहज कापता येते, जोडता येते.
त्याला हवा तसा आकार देता येतो.
लाकूड टिकाऊ असते.
लाकूड सगळीकडे मिळते.



©होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४०० ००५.
प्रकाशक : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
पुणे- ४११०२९.

आपण लाकडाचा खूप वापर करतो.



घरात सरपण म्हणून लाकडंच वापरतो.

घराचे खांब, तुळया, वासे लाकडी असतात.



खिडक्या - दारे लाकडाची करतात.

घरातली फडताळे, खुंट्या, फळ्या लाकडीच असतात.

किती तरी लाकडी वस्तू
आपण घरात वापरतो.
पोळपाट, लाटणे, रवी
अशा वस्तू आपण
स्वयंपाकघरात वापरतो.





टेबल - खुर्ची, खाट, बाकडे
मुलांची खेळणी या वस्तूही
लाकडापासून बनवतात.





शेतीची अवजारेही
लाकडी असतात.

कुंभाराचे चाक, हातमाग,
उसाचा चरक, तेलाचा घाणा,
रहाट या वस्तूही लाकडाच्या
करतात.



आपण आणखी कोणत्या लाकडी वस्तू वापरतो?
लाकूड मिळविण्यासाठी आपण कित्येक झाडे तोडतो.
यामुळे काही तोटा होतो का?
कोणकोणत्या वस्तूत लाकडाऐवजी इतर गोष्टी वापरता येतील?